# स्वा ती

( कांहीं कविता )

कवि—

बाळ मोकाशी,

ठाणें.

१९५६
…. ग्रं. सं. ठाणें
…य काव्य
क्र. १३५९
REFBK-0009104
REFBK-0009104

सन १९५६

# ★ स्वा ती ★

[ कांहीं कविता ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८१०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
क्रमांक ७३५७ नों० दि०
REFBK-0009104

कवि:—

बाळ रामचंद्र मोकाशी,

ठाणें.

प्रकाशन समारंभ दि. २४-१२-५६ रोजीं १७ व्या साहित्य सप्ताहाचे प्रसंगीं मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें, येथें 'प्रभात'कार श्री. **श्री. शं. नवरे,** बी. ए. (Hons) यांचे हस्तें पार पडला.

आवृत्ति १ ली ] किंमत ८ आणे [ सन १९५६

प्रकाशकः—

**श्री. दिवाकर पुरुषोत्तम आठवले,**

बी. ए. एल् एल्. बी., ॲडव्होकेट,

आठवले वाडी, नौपाडा, ठाणें.

[ सर्व हक्क सौ. **शैलजा मोकाशी** हिचे स्वाधीन ]

मुद्रकः—

**गोपाळ धोंडो फडके,**

अरुणोदय छापखाना, म्युनिसिपल

ऑफिसजवळ, ठाणें.

# ★ स्वाती ★

[ कांहीं कविता ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
वि:
क्रमांक ... नों. दि:

कवि:—

बाळ रामचंद्र मोकाशी,

ठाणें.

REFBK-0009104

प्रकाशन समारंभ दि. २४-१२-५६ रोजीं १७ व्या साहित्य सप्ताहाचे प्रसंगीं मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें, येथें 'प्रभात'कार श्री. **श्री. शं. नवरे,** बी. ए. (Hons) यांचे हस्तें पार पडला.

आवृत्ति १ ली ] किंमत ८ आणे [ सन १९५६

# उल्लेखनीय

ठाण्यांतील एक तरुण कवि व साहित्यिक श्री. **बाळ मोकाशी** हे माझ्या परिचयाचे आहेत.

कांहीं दिवसांपूर्वी ठाणें मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे झालेल्या **प्रा. वि. म. कुळकर्णी** यांच्या **'कमळवेल'** या काव्यसंग्रहावर चर्चा घेणेंत आली होती. या चर्चेत श्री. **बाळ मोकाशी** यांनीं आपले काव्यासंबंधीं विचार अत्यंत अभ्यासपूर्ण, सखोल व अस्खलितपणें मांडले आणि यावेळीं त्यांच्या प्रतिभेची चुणूक तेव्हांच दिसून आली. त्यांचा काव्यशास्त्राचा व्यासंग वाखाणण्यासारखा आहे.

विश्वविद्यालयीन शिक्षण, नोकरी, कौटुंबिक जबाबदारी ही सांभाळूनहि श्री. **मोकाशी** मराठी वाङ्मयाची सेवा करीत आहेत ही विशेष उल्लेखनीय व अभिनंदनीय गोष्ट आहे.

श्री. **दि. पु. आठवले**, बी. ए. एल् एल्. बी., वकील, ठाणें, यांनीं प्रकाशित केलेल्या त्यांच्या **'स्वाती'** या कांहीं कवितांच्या संग्रहास मी सुयश चिंतून श्री. **मोकाशी** यांची उत्तरोत्तर भरभराट होवो ही सदिच्छा बाळगतो.

आपला,

ठाणें,

दिनांक ७-११-५६.

**का. र. राऊत,**

चिटणीस,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

# दोन शब्द

कवितांची संख्या बरीच असून आज अनेक अडचणींमुळें त्या प्रसिद्ध करतां येत नाहींत. याबद्दल मनांतल्या मनांत कुढत बसण्यापलिकडे दुसरा मार्ग नाहीं. जीवन अफाट आहे. अनंत आहे. पण त्यांत खांच खळगे, कांटेकुटें तितकेच आहेत. जीवन पुष्पाला जरा कुठें अंकुर फुटतों, न फुटतों तोंच, क्रूर, राक्षसी, विध्वंसक वारा त्याचा चुराडा करण्यासाठीं टपलेला असतोच ! हा व्यवहार आहे. व्यवहार कठोर आहे कवि हृदयाला कदाचित् तो कळणार नाहीं. कदाचित् त्याला त्यांत स्वारस्य, गम्य वाटणार नाहीं आणि मग व्यवहारानं त्याला दगा दिल्यावर त्याला काव्यासारख्या दूरच्या जगांत, अदृश्य, कल्पनामय ( फार तर स्वप्नाळु म्हणा ! ) विश्वांत आनंद मानण्याशिवाय तरणोपाय नाहीं. तेंच त्याच जीवन सर्वस्व ठरतं ! कारण त्याला जगायचं असतं आणि दुसऱ्यांना सहजीवनानें जगूं द्यायच असत. "Live and to let live to co-exist" हे पू. महात्माजींच तत्त्व त्याच्या कविमनाच एकमेव ब्रीद ठरतं ! यांत कांहीं वावगे नाहीं.

आणखी काय लिहूं ? या थोडयाश्या काव्य पुष्पांची ओंजळ रसिक भृंगांनीं न्याहाळून त्यांतली चांगलीं घेणं आणि वाईट टाकून देणं हे ठरविणं सर्वस्वी त्यांच्याच हातीं आहे. त्यांचा हक्क हिरावण्याचा मला काय अधिकार आहे ? अस्तु.

आपला कृपाभिलाषी,

**वा. रा. मोकाशी.**

# उल्लेखनीय

ठाण्यांतील एक तरुण कवि व साहित्यिक श्री. **बाळ मोकाशी** हे माझ्या परिचयाचे आहेत.

कांहीं दिवसांपूर्वीं ठाणें मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे झालेल्या **प्रा. वि. म. कुळकर्णी** यांच्या **'कमळवेल'** या काव्यसंग्रहावर चर्चा घेणेंत आली होती. या चर्चेंत श्री. **बाळ मोकाशी** यांनीं आपले काव्यासंबंधीं विचार अत्यंत अभ्यासपूर्ण, सखोल व अस्खलितपणें मांडले आणि यावेळीं त्यांच्या प्रतिभेची चुणूक तेव्हांच दिसून आली. त्यांचा काव्यशास्त्राचा व्यासंग वाखाणण्यासारखा आहे.

विश्वविद्यालयीन शिक्षण, नोकरी, कौटुंबिक जबाबदारी ही सांभाळूनहि श्री. **मोकाशी** मराठी वाङ्मयाची सेवा करीत आहेत ही विशेष उल्लेखनीय व अभिनंदनीय गोष्ट आहे.

श्री. **दि. पु. आठवले**, बी. ए. एल् एल्. बी., वकील, ठाणें, यांनीं प्रकाशित केलेल्या त्यांच्या **'स्वाती'** या कांहीं कवितांच्या संग्रहास मी सुयश चिंतून श्री. **मोकाशी** यांची उत्तरोत्तर भरभराट होवो ही सदिच्छा बाळगतो.

आपला,

**का. र. राऊत,**

चिटणीस,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

ठाणें,

दिनांक ७-११-५६.

# दोन शब्द

कवितांची संख्या बरीच असून आज अनेक अडचणींमुळें त्या प्रसिद्ध करतां येत नाहींत. याबद्दल मनांतल्या मनांत कुढत बसण्यापलिकडे दुसरा मार्ग नाहीं. जीवन अफाट आहे. अनंत आहे. पण त्यांत खांच खळगे, कांटेकुटें तितकेच आहेत. जीवन पुष्पाला जरा कुठें अंकुर फुटतों, न फुटतों तोंच, क्रूर, राक्षसी, विध्वंसक वारा त्याचा चुराडा करण्यासाठीं टपलेला असतोच ! हा व्यवहार आहे. व्यवहार कठोर आहे कवि हृदयाला कदाचित् तो कळणार नाहीं. कदाचित् त्याला त्यांत स्वारस्य, गम्य वाटणार नाहीं आणि मग व्यवहारानं त्याला दगा दिल्यावर त्याला काव्यासारख्या दूरच्या जगांत, अदृश्य, कल्पनामय ( फार तर स्वप्नाळु म्हणा ! ) विश्वांत आनंद मानण्याशिवाय तरणोपाय नाहीं. तेंच त्याच जीवन सर्वस्व ठरतं ! कारण त्याला जगायचं असतं आणि दुसऱ्यांना सहजीवनानें जगूं द्यायच असत. "Live and to let live to co-exist" हे पू. महात्माजींच तत्त्व त्याच्या कविमनाच एकमेव ब्रीद ठरतं ! यांत कांहीं वावगे नाहीं.

आणखी काय लिहूं ? या थोडयाश्या काव्य पुष्पांची ओंजळ रसिक भृंगांनीं न्याहाळून त्यांतली चांगलीं घेणं आणि वाईट टाकून देणं हे ठरविणं सर्वस्वी त्यांच्याच हातीं आहे. त्यांचा हक्क हिरावण्याचा मला काय अधिकार आहे ? अस्तु.

आपला कृपाभिलाषी,

**बा. रा. मोकाशी.**

## ऋण

ठाण्याचे उदार काँग्रेस कार्यकर्ते श्री. दि. पु. आठवले, बी. ए. एल्‌एल्. बी., वकील, यांनीं सदर काव्य संग्रहाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वतः जातीनें पत्करून मला ऋणी करुन ठेवलें आहे, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें हें माझें आद्यकर्तव्य आहे. तसेंच श्री. का. र. राऊत, चिटणीस, मराठी ग्रंथ संग्रहालय, यांनीं प्रोत्साहन दिल्याबद्दल, श्री. गो. धों. फडके, मुद्रक, अरुणोदय प्रेस, ठाणें, यांनीं छपाईचे काम सुबक, वेळेवर व अडचणीं विचारांत घेऊन करून दिल्याबद्दल, प्रकाशनाचा परवाना देण्याला योग्य ते सरकारी अधिकारी यांनीं जे सहाय्य केलें त्याबद्दल त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

लेखक

## प्रकाशकाचे दोन शब्द

९०८

कवि बाळ रामचंद्र मोकाशी हे माझ्या परिचयाचे आहेत. खडतर अशा परिस्थितीशीं झगडून वर आलेल्या तरुणांपैकीं ते एक आहेत. त्यांना मातृ-पितृ-सुख फारसें लाभले नाहीं तरी केवळ आपल्या सामाजिक आणि कार्यप्रवण वृत्तीनें, काळाशीं टक्कर देऊन ते जीवनक्रम कंठीत आहेत ते आपली नोकरी सांभाळून फावल्या वेळांत सामाजिक कार्यांतहि भाग घेतात.

काव्यासारख्या विषयांत पारंगतता मिळविणें ही सामान्य गोष्ट नाहीं या भावनेनें प्रेरित होऊन मी जातीनें त्यांच्या कवितांपैकीं कांहीं प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतले. हे झालें कवि विषयीं. असो.

आतां काव्याविषयीं श्री. मोकाशी यांच्या 'स्वाती' तील कवितांवर नुसता दृष्टिक्षेप टाकल्यास, कोणत्या वर्गातील कवींत ते गणले जातात हें ठरविणें कांहीं कठीण नाहीं. त्यांची प्रत्येक कविता अर्थपूर्ण तर आहेच, पण तत्त्वपूर्णहि आहे. ते एक तत्त्वज्ञ कवि आहेत. नवकवि आहेत. त्यांची दृष्टि निसर्गावर रुळते आणि मग ते बालमनाची सांगड निसर्गातल्या वस्तूंशीं घालतात. बालमनाची कोमल गुंफण

**उन्हांत हलक्या जाइल करपुन**
**उधळुन नेइल मंद वातहि**
**विसकटल्यावर जुळण्या निष्फल**

इतके हळुवार वर्णन करुन तिचे नाजूक स्वरुप दर्शवितात.
मानवाचा स्वार्थी व चुकीचा दृष्टिकोन सिद्ध करण्यासाठीं रस्त्याच्या तोंडून.

**चरणाखालीं पतीत हृदयें**
**कण्हती न्यायासाठीं**
**खंत न याची तुला मानवा !**
**पळतां ध्येयापाठीं !**

असें वदवून माणसाला आत्मनिरिक्षण करायला प्रवृत्त करतात.

'सगळं सगळं तेंच आहे' या कवितेंत चिंचा व बोरें यांचे उदाहरण देऊन सर्व वस्तू त्याच आहेत पण कालपरत्वें माणसाचा त्या वस्तूंकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलत जातो "The out look changes with the time" हे तत्त्व उत्तम रितीनें विषद करतात.

'ताजमहालाचा तडा' या कवितेंत आज जगांत चाललेल्या मानव हानीच्या वृत्तीवर आघात करुन अॅटम बॉंबच्या जगांत सुंदरवस्तू अभिजात सौंदर्य असलेल्या कलाकृतीहि विथरल्या आहेत. मग मानवाचं काय! असे विचार मांडून शेवटीं ताजमहालाला नुकत्याच गेलेल्या तड्याचा संदर्भ घेऊनः—

**थांबव हा संहार**
**मानवा! थांबव हा संहार**
**आणि जगाचा घडव मनोहर**
**ताजच शांताकार!**

असा खणखणीत शांतीचा इशारा देतात. आणखी कितीतरी दुसऱ्या कवितांबद्दल लिहितां येईल पण जातां जातां इतका उल्लेख करणें भागच पडले.

रसिक वाचक या 'स्वाती' सग्रहांतील मौक्तिकांना पारखून त्यांची किंमत, मूल्य ठरवतील अशी आशा बाळगून. मी माझी लेखणी थांबविते.

**दि. पु. आठवले,**
बी. ए. एलएल. बी., अॅडव्होकेट, ठाणें.

आठवले वाडी, नौपाडा, ठाणें.

म.ग्रं.सं. ठाणे यांस
सप्रेम भेट:
कावे.

‘युग प्रवर्तक’ व ‘तत्त्वज्ञ’ या पदवीस

पात्र असलेल्या पण प्रसिद्धि—

पराङ्मुखतेचे व्रत धारण करणाऱ्या

त्या महाराष्ट्राच्या थोर कवीस

कवि ‘बी’ यांस

ही अल्पशी

कृति


अ र्प ण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों: दि ......

# -: अनुक्रमणिका :-


| कवितेचें नांव | पान क्रमांक |
|---|---|
| स्वाति-स्वाति ! | १ |
| किल बिल | २ |
| कुठें आहे ती शांतता ! | ३ |
| माया | ४ |
| परिवर्तन | ५ |
| ज्ञान दीप | ५ |
| रस्त्याचें मनोगत | ६ |
| अधः पात ! | ८ |
| व्यर्थ रोधती— | ९ |
| स्वप्न-पूर्ति — | १० |
| रक्त कुणाचे— | ११ |
| बालमनाची गुंफण | १२ |
| पुन्हा पुन्हा ये सामोरी | १३ |
| सगळं सगळं तेंच आहे ! | १४ |
| एक कल्पना | १६ |
| ताज महालाचा तडा | १७ |
| खुलतां तव स्मित गालीं— | १७ |
| एकदां विचारा— | १८ |
| पूज्य बापूजीं प्रत — | २० |

# हद्दत



अणु अस्त्रांचा धुव्वा उडवुन
टाका जाळुन युद्ध नगारे
नवक्षितिजाच्या नव्या कडांवर
शिल्पुन सजवा शांत मनोरे

घरा घरांतुन, पर्ण कुटींतुन
शान्त स्वराला फुटतां अङ्कुर
मानवतेच्या मनांत दडला
कल्पवृक्षहि वठेल सत्वर

मग—

'स्वराज्य आले कोणासाठीं ?'
'सुराज्य तेहि कशास घडते ?'
'कुठें स्वातंत्र्य'? 'कुणा स्वातंत्र्य' ? म्हणेल कोणी ?
नव्या कृती अन् नव बंधारे
उत्तर देतिल ठांसुनि हांसुनि !

— बाळ मोकाशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २१५२८ वि. ८१०५
क्रमांक ११३४९ नों. दि. २८/२/५८

# स्वाति-स्वाति !

प्रभातकालीं रम्य जगावर
चराचराच्या चित्सौंदर्यावर
नवीनतेचें शिंपित पाणी
गाते धरणी मंगल गाणीं.

कुणी अप्सरा स्वर्गामधली
नाचत नाचत भूवर आली
करीत रुणझुण पायीं पैंजण
हास्य कळ्यांची झाली पखरण.

सरली चित्रा हस्तहि सरले
मेघ मघांचे कधींच विरले
आज अवतरे उज्वल स्वाती
स्वैर नर्तना लाटांवरती.

निळसर काळ्या जलःपटावर
नागमोडिच्या अन् वळणावर
कुणीं सांडलीं माणिक मोतीं
ध्वनी उमटला आभाळांतुन—
स्वाति-स्वाति !

# किल बिल

थरथरते नव स्निग्ध पालवी
आसूसलेली
हिरवट काळी.
स्थिरावले दंवबिंदु
जणूं सांचली पुटें—
आशेची
निराशेची
चोर पावलीं
खटयाळ वारा
किल्मिषाचे काजळ घालुन
उठवी काहुर आणि—
उभटतात तरंग
कसलेतरी
कसली तरी—
होते सळसळ.
भारावल्या काळया रात्रीं,
गोड अवीट सुगधांत
शेजेवरती,—
रातराणीच्या
रानजुईच्या
निशिगंधाच्या
सुरुं होते

कसली तरी—
शिरशिरणारी,
भिरभिरणारी,
रुपणारी
गोऽड किलबिल.

—×—

# कुठें आहे ती शांतता !

जिथें बिलगतो देह चितेला
गिर्योन्नत अन् उठती ज्वाला
जिथं शुष्क हो जीवन-सरिता
तिथें असे कां खरी शांतता !

जिथें जिवांची नातींगोतीं
तुटुन तटातट फत्तर बनतीं
जिथें भुतांची चाले सत्ता
तिथें असे कां खरी शांतता !

जिथें नभाचा काय निवारा
अनल चेतवी विझणवारा
जिथें कुणाला कुणी न त्राता
तिथें असे कां खरी शांतता !

जिथें ऋतूंची मुळीं न खन्ती
सुखदुःखांचीं पळहि भ्रान्ती
जिथें विरामे सारी चिन्ता
तिथें असे कां खरी शांतता !

# माया

जीवन स्वप्नांत
आशेची पैंजणें
मधून मधून
नादावती.

धांवते सावली
उजेडाच्या पाठीं
जीव भेटीसाठीं—
आसूसला.

नक्षत्रांची ओळ
आकाश रिंगणी
पृथ्वीच्या दर्शनीं
हेलावते.

कोकिल कण्ठात
दाटली आर्तता
शोधण्या वसन्ता
वर्षोवर्षा.

वेडी वेडी माया
मानव मनांत
आशेच्या प्राङ्गणीं
डोकावतें.

—×—

# परिवर्तन

कशास मागे मागे येशी
हलकेंच वळुन कां हंसशी ?

मनोवाञ्छितें उरलीं सुरलीं
काव्यांतच कीं, अवघी विरलीं
कल्पनेंत मम सृष्टी नटली
कां उसन्या अवसानीं भुलसी ?

नीलिम्यांतली दडली माया
चंद्रकरांची माझी दुनिया
आभरणें तीं; अलंकार वा
मृगजळिया गुंतुन कां फसशी ?

घोर निशेच्या साम्राज्यावर
संचित असतां दिव्य जगावर
स्वप्नींच जगाचे तुटते अंतर
कां मूक प्रियकरा वरसी ?

—— × ——

# ज्ञान दीप

होतिल फिक्कट चंद्र तारका
दीप जगांतील सारे विझतिल
परि ज्ञानाचा दीप सारखा
अखंड तेवत तेवत राहिल.

तप्त रवीनें अटेल सागर
सरेल जलहि मत्त ढगांतिल
परि ज्ञानाची भरली घागर
ज्ञान जलाविण कधीं न राहिल.

तुटेल तारा होइल फत्तर
धवल चंद्रिका अस्ता जाइल
परि ज्ञानाचे पवित्र अत्तर
गंध सदोदित घुमवित राहिल.

चौर्य धनाचे करील कोणी
चोरुन नेइल कोणी अंतर
परि ज्ञानाची सुवर्ण खाणी
चौर्य कराया अतीव दुस्तर

जरि ज्ञात्याची नसेल मूर्ति
असेल विझली जीवन ज्योति
तरी तयाचीं उरेल कीर्ती
ज्ञान दीप मय स्तम्भावरती.

## रस्त्याचे मनोगत

उपहासानें हळूच हंसतो
खट्याळ मिष्किलवात
पाचोळाहि वरी नाचतो
खुशाल तो निभ्रान्त

दांत चावुनी प्रमत्त विजली
कधीं कोसळे उरीं
अथांग दर्या खवळुन केव्हां
फेंकी जललहरी

वर्षासमयीं जलधारांचा
चाले ताण्डव नाच्
शिशिरामधलें हींव कांपरे
उठवित ये रोमाञ्च

मुळीं न कल्पना तुला मानवा!
दलित जिवाणूंची
मिरवित तूंहि, तुडवित फत्तर
सौख्यानें रमसी.

शत तोफांच्या तुटून पडतां
छातीवर फैरी
तरी न हलते सेवाव्रत हे
धैर्याच्या उदरीं.

कर्तव्याचे तुझे मनोरे
स्वार्थावर डोलती
तुझी आढ्यता जणूं मुलायम
संगमरवरी शिल्पकृति.

असंख्य उठली आणी पुसलीं
काळाची पावलें
अमाप उडली पदसंसर्गी
देहाची शकलें

चरणाखालीं पतीत हृदये
कण्हती न्यायासाठीं
खन्त न याची तुला मानवा !
घळतां ध्येयापाठीं.

# अधः पात !

ऐटीमध्यें सिनेनटाच्या
घिरट्या घाली चंद्र सभोंती
हळूच अुडवी मिष्किल डोळे
कोंपऱ्यांतला बारिक तारा–

कोंपऱ्यांतला बारिक तारा–
झुरे पाहुनी शुक्र चांदणी
टोळीवाल्या ताऱ्यासंगें
रोज मनोगत घोटत बसतो

घोटत बसतो रोज मनोगत–
तिष्ठत असतो प्रेम पथावर
चंद्र रोहिणी दिसतां आणि–
झर्वी मुद्रा केविल वाणी.

शुक्र चांदणी प्रणय सुंदरा
लवून बघते 'विंडो' मधुनी
रत्न खनींतुन हंसते माणिक
नयन झांकळी तेजकणांनीं !

शुक्र चांदणी बघते प्रतिदिन
झिजत चालला 'बारिक तारा'
पाझर फुटला स्त्री हृदयाला
दूत पाठवी भेटीसाठीं.
दूत भेटण्या आल्यावरती-
थरथर कांपे प्रणय धुरंधर
'कशास राणी बोलावी मज
अपराधी मी काय कुणाचा' ?
थरकांपला तरी आवरुन-
जाण्या निघतो दूतासंगें
परि भीतीनें गडगडला तो
ठिक्कर काळा पडला खालीं
पडला खालीं जातां जातां
बनला फत्तर काळा काळा !

—— × ——

# व्यर्थ रोधती——

अजून दारीं चिमणी येते
तुळशीला अन् उगाच छळते
अजून टिटवी आभाळांतुन
अंधाराला चाटुन जाते
अजून उठते क्षितिजावरती
इंद्रधनुची बांक कमानी
अजून डोंगर करतो हितगुज
उंचावुन शिर भव्य हिमानी

अजून रुसतो माळ दूरचा
लोळण घेतो वणव्यामध्यें
अजून हलते पिम्पळपान्
उग्र भयानक अग्निमध्यें.
अजून सरल्या दिवसामधला-
काळोखाचा उरतो श्वास
अजून हळव्या मीलन राती
व्यर्थ रोधती उरला तास !

## स्वप्न–पूर्ति––

नवज्योत नभावर आली
रंग रुचीला एक पसंती
भेद विसरली मानवजाती
क्रोध रिपूंना देउन मात्तीं
क्रांति उठली !
दूर सारण्या दैन्यगतीला
युगायुगांच्या दुर्बलतेला
बरबटलेल्या जीर्ण मताला
जाळण्या आली !
श्रमती कोणी पोटासाठीं
टिचभर जाड्या वस्त्रासाठीं
धांवत आली त्यांच्यासाठीं
तपस्या फळली !
शेत घरांवर समान प्रीति

...संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २१५२८ वि: ३/०५
क्रमांक ७३५१ नों: दि: २८/११/५८



बोल न लावी नीति अनिती
श्रमणाऱ्यांची अवघी धरती
भ्रान्त मावळली!
दुवे जोडण्या नव्या जुन्याचें
दीप उजळण्या नैराश्याचे
निशाण मिरवित उज्वलतेचें
प्राची स्फुरली!
तपातपांच्या मनोगताला
मनांत जिरल्या मृत आशेला
सजीव करण्या अजीवतेला
फुलवित आली!

## रक्त कुणाचे—

जुळवी नातें
-आणि कुणाचा खुलवी कुंकुम्
रक्त कुणाच्या बुजल्या जखमा
ओल्या करुनी घडवी संगम.
रक्त कुणाच्या—
आरक्तावर
सौंदर्याला देते जीवन
रक्त कुणाच्या गोऱ्या गालीं
गुलाब कलिका देते उधळुन.
रक्त कुणाच्या—
कृश आत्म्याला

उरल्या शद्वा देते अवसर
रक्त भूषवी वसुन्धरेला
प्राजक्ताच्या जणुं देंठावर
रक्त कुणाच्या—
पराक्रमाचे
घडवी सुंदर स्मारक शाश्वत
रक्त जगविंत क्रोधरिपूंना
-आणि रंगवी प्रणयी संगत.
रक्तापासून—
बनला मानव
जगला तोहि रक्तावरती
अखेर ठरला रक्तपिपासु
असली कसली कोती नियती !

# बालमनाची गुंफण

उन्हांत हलक्या जाइल करपुन
उधळुन नेइल मन्द वातहि
विसकटल्यावर जुळण्या निष्फल
बालमनाची गुंफण कोमल.
सात्विकतेच्या तंतुमधली
पेळुमधली निष्कपटाच्या
दगडालाहि करील सोज्वल
बालमनाची गुंफण कोमल.
हलते डुलते आशेवरती

अल्प सुखाच्या धाग्यावरती
विस्मयकारी अस्फुट चञ्चल
बालमनाची गुंफण कोमल
विसावलेली कमल-दलावर
निळ्या निळ्याशा अस्मानावर
उदात्ततेचे उभवी वारुळ
बालमनाची गुंफण कोमल
मंदिरांतली प्रशान्त ज्योति
भावनेंतल्या हळूपणासम—
सुखवा, उकला दिव्य सुमंगल
बालमनाची गुंफण कोमल

## पुन्हा पुन्हा ये सामोरी

मंद मंद चालीवर
कांहींतरी रेंगाळत
पुन्हा पुन्हा ये सामोरी
सले खोल अंतरांत
वाटेवर अंधारांत
खुणावती गांठीभेटी
विसावल्या पांखरांना
बिलगते आस खोटी.
खोल खोल काळजांत
आसुसल्या ओंठावर
करी चाळवा चाळव

तुझा ओळखीचा सूर
पुन्हा पुन्हा ये सामोरी
न्याहाळीत चांदरात
तुझी वेडी आठवण
सले खोल अंतरांत.

## सगळं सगळं तेंच आहे !

सगळं सगळं तेंच आहे.
मीच तेवढा बदललो !
ह्याच चिंचा हींच बोरं
आज सुद्धां खावीशीं वाटतात—
चघळायचं त्राण नाहीं
तोंडांत दांतहि नाहींत
जीभ पण-रुचिहीन.
धावत्या आयुष्याच्या गतीबरोबर
चव पळाली.
तरी तोंडाला पाणी सुटल्यावर.
आंबट आंबट गोड गोड
ह्याच चिंचा हीच बोरं
दिसतात. नुसती दिसतात !
ह्याच चिंचा हीच बोरं
ऐन पंचवीशीच्या भरांत
कुठेंतरी, केव्हांतरी
संध्याकाळच्या मादक छायेंत

कुणाला तरी—
जीवनांतल्या माधुरीला,
पूर्णतेला,
चांचल्याला
स्थिरावण्यासाठीं गोळा केली.
आणि ठरल्यावेळीं
स्थळीं—
धांवत गेलो
पण तिथं, दरडीवरती
कुणीच नव्हतं !
म्हणून-ह्याच चिंचा हीच बोरं-कोटाच्या खिशांत सुकून गेली
ह्याच चिंचा हीच बोरं
आणण्यासाठीं —
मास्तरांचा मार चुकवून
आईच्या बुक्याला न जुमानतां,
शाळेला दांडी मारून
अर्ध्या विजारींत
कोंबून ठेवली- आणि
बालपणींच्या
निर्भयतेच्या
उच्छृंखलपणांत
मनमुराद मनसोक्त खाल्ली.
ह्याच चिंचा हीच बोरं
सगळं सगळं तेंच आहे
मीच तेवढा बदललो. !

# एक कल्पना

निळया नभाचे तुकडे पाडुन
अखंड पत्रा बनवावा
चंद्राचे अन् चूर्ण करोनि
चंदेरीवर गिलीट देऊनि
नरसाळयाचा आकार द्यावा.
ते नरसाळे नभास भिडवुनी
खोल भुयारी टोंक सोडुनी
आणतां येइल खालि विजेला.

# ताजमहालाचा तडा

ताजमहाल————
निर्मितींत हसला जो
धारणेंत रमला जो
तो आज ढाळतो अश्रू
केवळ 'लय' भीतिनें
तो तडाच देईल साक्ष तयाची
कीं जाळते तयाला
भविष्यकालिन भीति
मानवा ! कां न रुसावा ताज तुझा हा
जर विनाशांत तू रमसी ?
थांबव हा संहार आंता
थांबव हा संहार
आणि जगाचा घडव मनोहर
ताजच शांताकार.

——×——

# खुलतां तव स्मित गालीं—

खुलतां तव स्मित गालीं –
शतपुष्पें मानसीच्या—
कौमुदींत विस्फरली
खुलता तव स्मित गालीं—
मृदु जाली शब्दांच्या

श्वासांच्या लहरीवर
कवडशांत अंधुकशा
भिरभिरली प्रीत खुळी
खुलता तव स्मित गालीं—
चाळवले दंग भृंग
अवकाशी मादकशा
धगल्या अंगावर
नव आशा चुळबुळली
खुलता तव स्मित गालीं—
ओघळले दंवबिंदु
चमचमली तृणपातीं
वाऱ्यावर झुळझुळल्या—
हेलावत अंतरली
खुलता तव स्मित गालीं—
नश्वर तव दर्शनांत
झरझरतो अश्रुवेग
क्षणभंगुर सागरांत
बचतो मी मासोळी.

## एकदा बिचारा—

एकदा बिचारा । एक कारकून
वदे संतापून । नको हे जीवन
दारिद्र्याची खाण । वैरणीची वाण ।
ऋणाचे अन् रान । माजले भयाण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



अनुक्रम ............ वि. ............
क्रमांक ............ नों. दि. ............

संसाराचा गाडा । कसा हांकरावा
कसा थांबवावा । दारिद्र्य दणवा.
ध्यानीं मनीं स्वप्नीं । अर्थ-निदिध्यास
अर्थाचा हव्यास । अर्थची विश्वास.
डोकें खाजवून । भांबावून गेला
अखेरीस त्याला । उपाय सुचला

'  'सत्ता'[1] 'मान्य'[2] यांचें । भरावें चाकोन
शून्य चुकेचे अन् करावे चिंतन '.
गुंतवून सारे । चौकोनांत मन
आठवी जपून । 'तन' किंवा 'धन'.
गेले वारंवार । हातांतुन तीर
परि तो खंबीर । सोडला ना धीर.
कित्येक चौकोन । धाडी भराभर
कोड्यामाजीं सारा । उडाला पगार.
गेले भराभर । पन्नास 'सत्ते'ला
सारण्या दैन्याला । पन्नास 'मान्या'ला.
उत्तर पहातां कळीहि खुलली
दोन्ही कोड्यामाजीं । शून्य चूक आली.
फुगला गर्वानें । नाचला हर्षानें
पाही चोंहिकडे । आनंदी मनानें
परि-
एकदिनीं । चमत्कार झाला
पोस्टमन आला । चेक द्यावयाला.
चेक कसला अन् । पैसा कशाचा ?
कोडीं परतली । पत्ता चुकीचा !
'सत्ता' 'मान्यां'कडे । 'मान्य' 'सत्ते'कडे

पत्त्याचा गोंधळ । भोंवें विचाऱ्याला.
सुटे कोडें त्याला । परी भांबावला
पत्त्याच्या चुकीला । उगा पात्र झाला.
मनाची साम्राज्यें । मिळाली धुळीला
कोड्यांच्या विचारा । विसरे बिचारा.

१. दैनिक लोकसत्ता. २. दैनिक लोकमान्य, मुंबई.

# पूज्य बापूजीं प्रत—

( राग-यमन कल्याण )

नमन पूज्य बापुजींस । दिव्य वंद्य त्या विरास ॥ ध्रु०॥
राष्ट्रदीप पाजळून
अज्ञ तिमिर दूर करुन
भारतास दे प्रकाश । नमन पूज्य०
भारत हा एक प्राण
स्वातंत्र्यें मुक्त करिन
रात्रंदिन हाचि ध्यास । नमन पूज्य०
झाणुनियां धर्मभेद
राष्ट्रपिढी करि अभेद्य
राष्ट्राचा करि विकास । नमन पूज्य०
सत्याची ठेवी चाड
हिंसेची आणी चीड
विकसित करी मानवास । नमन पूज्य०

जनतेला जागवून
परक्यांना त्रस्त करुन
दुष्टांचा करि विनाश । नमन पूज्य०

साधण्यास राष्ट्रोन्नति
देई जो प्राणाहुति
पारतंत्र्य ने लयास । नमन पूज्य०

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २१८२८ वि: ७१०५
क्रमांक ९३५९ नों: दि: २०-१२-४९

REFBK-0009104
REFBK-0009104

# शुद्धिपत्र

| पान क्र. | ओळ क्र. | अशुद्ध ओळ | शुद्ध ओळ |
|---|---|---|---|
| २ | १८ | शेजेवरती,- | शेजेवरती— |
| ४ | १६ | वर्षांवर्षी | वर्षोवर्षी |
| १२ | ९ | रक्तापासून- | रक्तापासुन- |
| १७ | १० | तू | तूं |
| १७ | ११ | थावव | थांबव |
| १७ | ११ | आंता | आतां |
| १७ | १२ | थांवव | थांबव |
| १७ | २ | मानसचिया— | मानसिच्या— |
| १८ | ७ | धगत्या | धगधगत्या |
| १८ | २ | संतापूत | संतापून |
| १९ | २ | दारिद्र वणवा | दारिद्र्य-वणवा. |